**प्रेस नोट** **दिनांक ०९/०३/२०१९**

## फराखाना पोलीस स्टेशन

## मोबाईल चोरास अटक

फराखाना पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे कर्मचारी पो.हवा.१२६८ खुटवड, पो.ना.४१०२ भांदुर्गे,पो.शि. ७८९९ शिंदे, पो.शि. ७६५३ दळवी असे फरासखाना पोलीस स्टेशन हद्दीत पायी पेट्रोलींग करीत असताना फिरत फिरत क्रांती हॉटेल चौक बुधवार पेठ पुणे येथे १९.३० वा.चे सुमारास दत्त मंदीराकडुन एक इसम लगबगीने येताना दिसला. त्यास स्टाफचे मदतीने थोडयाच अंतरावर त्यास पकडुन त्याचे नाव पत्ता विचारता त्याने आपले नाव के. कृष्ण पात्रौ वय २४ मुळ रा.बाबु पात्रौ १२६ खटेई कॉलनी १ नं. लेन ग्राम कन्सीहाटा कोनीसी गंजम ओरीसा सध्या पुणे फिरस्ता असे सांगितले. तो त्याचे पँटचे खिशामध्ये काहीतरी लपवीत असल्याचा संशय आल्याने त्याचे खिसे तपासुन पाहता त्यामध्ये एक महागडा मोबाईल मिळुन आला. त्याबाबत त्याचेकडे चौकशी करता त्याने सदरचा मोबाईल फोन दगडुशेठ गणपती मंदिराचे समोर चोरला असल्याचे सांगितले. त्याबाबत फरासखाना पोलीस स्टेशन, येथे गुन्हा नोंद करण्यात आला असुन, सदर आरोपीस गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

(किशोर नावंदे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे